## परिशिष्ट १
## चारा खरेदी व वाहतुक दर ठरविणेची जाहिर सुचना
## (जिल्हाधिकारी कार्यालय सांगली)
## चारा पुरवविणे तसेच चारा वहातूकीबाबत दर निश्चितीसाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील

१. निविदेचा विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली यांचे कार्यालयात दिनांक : १८/११/२०११ ते दिनांक २५/११/२०११ अखेर (शासकीय व साप्ताहिक सुट्टी वगळून) कार्यालयीन कामकाजावेळी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वा. पर्यंत उपलब्ध करून दिले जातील.

२. तालुका निहाय निवीदा फार्मचे किमत परिशिष्ट ६ मध्ये नमूद आहे. ती (नापरतावा) इतकी राष्ट्रीयकृत बँकचे डीमांड ड्राफ्ट द्वारे जिल्हाधिकारी, सांगली यांचे नावे काढून डिमांड ड्राफ्टसह निविदा फार्म मागणीचा अर्ज सादर करवा लागेल.

३. परिपुर्ण सिलबंद निविदा जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली यांचे कार्यालयात दिनांकः२५/११/२०११ अखेर दुपारी ३.०० वा. पर्यंत स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त निविदा अर्जांचा विचार केला जाणार नाही.

४.मोहोरबंद निविदा जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात दिनांक : २८/११/२०११ रोजी दुपारी ४.०० वाजता किंवा मा. जिल्हाधिकारी ठरवतील त्या सोयीच्या कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील .

५. निविदा दोन लिफापा पध्दतीने सादर करावी लागेल.

**लिफापा क्र. १.** : तांत्रिक लिफाफा : या लिफाप्यामध्ये खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

१. बयाणा रक्कम रूपये निविदेच्या परिशिष्ट ६ मध्ये तालुकानिहाय नमुद केल्याप्रमाणे चारामुल्याच्या १% नुसार होणारी रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्ष (डी. डी.) स्वरूपात मा. जिल्हाधिकारी सांगली यांचे नावे देणे.
२. व्यवसायाचे नोंदणीप्रमाणपत्र, पॅन कार्ड इत्यादी अद्यावत कागदपत्रे सादर करावीत.
३. अनुभवाचे प्रमाणपत्र.
४. किमान १० ट्रक स्वतःचे नांवे अथवा वाहतुकदारांशी कारारनामा केलेले (नियंत्रणाखालचे) असणे आवश्यक आहे याशिवाय चारा डेपोच्या ठिकाणी पुरेसा व वेळेत चारा उपलब्ध करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी वेळोवेळी निश्चित करतील तेवढी वाहने (ट्रक) उपलब्ध करून देणेबाबत हमीपत्र.
५. कोणत्याही शासकीय/निमशासकीय विभाग/कार्यालयाचे इतर कोणत्याही कामामध्ये काळ्या यादीत समाविष्ट न केल्याबद्दल शपथपत्र. तसेच भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली नसल्याचे शपथपत्र.
६. निविदा मंजूर झाल्यास निविदा अटी व शर्ती प्रमाणे परिशिष्ट ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे बयाणा रक्कम, सुरक्षा अनामत रक्कम व राष्ट्रीयकृत बँकचे बँक गॅरेंटी प्रमाणपत्र देणेबाबतचे तसेच रूपये १० लाखचे महसुल ऐपत (सॉलव्हनसी) प्रमाणपत्र देणेबाबत शपथपत्र.
७. मालकीच्या व नियंत्रणाखालील ट्रकचे आर. सी. बुक व वाहन सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्राची (सक्षम अधिकाऱ्यांचे) साक्षांकित प्रत.
८. निविदे सोबत सादर केलेले स्वतःच्या मालकीचे ट्रक व नियंत्रणाखालील ट्रक दुसऱ्या जिल्ह्यातील तसेच इतर कोणत्याही वाहतुकीच्या कंत्राट / करारनाम्यासाठी उपयोगात आणले नसल्यासंबंधीचे शपथपत्र.
९. नियंत्रणाखालील ट्रक मालकाचे चारा वाहतुकीसाठी ट्रक उपलब्ध करून देण्यासंबंधीचे शपथपत्र.
१०. निविदेसोबतच्या अत्यावश्यक कागदपत्राच्या /प्रमाणपत्राच्या छायाप्रती साक्षांकित /प्रमाणित केले असणे आवश्यक आहे.
११. निविदेच्या प्रत्येक पानावर सही केलेली असणे आवश्यक आहे.

**वरील प्रमाणे १ ते ११ प्रमाणे कागदपत्रे परिपूर्ण असतील तरच लखोटा क्र. २ उघडला जाईल. याची नोंद घ्यावी.**

II) **लिफापा क्र. २. :** व्यापारी दराचा लिफापा : जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुरविलेल्या विहीत नमुन्यामध्येच (परिशिष्ट तीन) प्रपत्रामध्ये अंकी व अक्षरी दरनमुद करणे आवश्यक राहील.

एक व दोन नंबरचे लिफापा स्वतंत्ररित्या सिलबंद करून लिफापे एकत्रित एका मोठ्या लिफाप्यामध्ये घालून तो लिफापा सिलबंद करून जिल्हाधिकारी, सांगली यांचे नावे दिनांक : २५-११-२०११ पूर्वी दुपारी ३.०० वा. पर्यंत जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली यांचे कार्यालयात सादर करावा.

निविदाबाबतच्या इतर अटी व शर्ती पुढील प्रमाणे.

१. कंत्राटदारांचा कालावधी एक वर्षापर्यंत अथवा चारा टंचाई संपेपर्यत अंमलात राहील.

२. चारा पुरवठा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी सांगली अथवा ते ज्या सक्षम अधिकाऱ्यांना प्राधिकृत करतील अशा अधिकाऱ्यांनी स्पष्ट लेखी आदेश दिलेल्या तारखेपासुन २४ तासांच्या आत नमुद केलेल्या ठिकाणी संबंधित चाराडेपोत पोहच करावा लागेल. आवश्यकतेनुसार चारा पुरवठा करणे अथवा बंद करण्याचे अधिकारप्राधिकृत अधिकाऱ्यांना रहातील.

३. ओला व वाळलेल्या चाऱ्याचे दर वाहतुकीसह तसेच वाहतुकी शिवाय असावेत. चारा पुरवठा व वहातुकीचे दर निविदा भरताना कोणत्या तालुक्या करीता दरपत्रक भरणेत आली आहेत याचा बोध होणेसाठी सीलबंद लफाफयावर तालुक्याचे नाव सुस्पष्टपणे वेगळे दर्शवावे. चारा पुरवठा करावयाचे तालुकेतील मंडळ निहाय गावांची यादी निविदा सुचना सोबत जोडणेत आली आहे.

४. मा. जिल्हाधिकारी यांनी तालुक्यातील घोषित केलेल्या चारा डेपोवर पुरवठाधारकास चारा पुरवावा लागेल. जिल्हयातील तालुकानिहाय चारा डेपो सुरु करणेसाठी घोषित केलेल्या गावाचे ठिकाणी चारा खरेदी वाहतुकी सह व फक्त वाहतुकीचे दर तालुकानिहाय स्वतंत्र दयावे लागतील. निवीदाकाराने निविदेतील तालुकानिहाय चारामुल्याच्या १% बयाणा रक्कम परिशिष्ट ६ प्रमाणे जिल्हाधिकारी सांगली या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी. डी.) द्वारे जमा करावी लागेल.

५. मान्य निवीदाकारांनी राष्ट्रीयकृत बँकेची गॅरंटी रुपये २,००,०००/- (अक्षरी दोन लक्ष रूपये मात्र) करारनामा करतेवेळी सोबत सादर करणे आवश्यक आहे.

६. ज्या निविदाधारकाचे ठेक्याचे दर मान्य केले जातील त्यांना सुरक्षा अनामत सोबत परिशिष्ट ६ मध्ये दिले तपशिला नुसार राष्ट्रीकृत बँकेचा डी. डी. निविदा मंजूर झालेनंतर तातडीने द्यावा लागेल.

७. पुरवठाधारक / कंत्राटदार यांनी निवीदा सादर करतेवेळी निविदेसोबत ज्या प्रकारच्या चाऱ्याचा पुरवठा करावयाचा आहे त्या चाऱ्याचा सिलबंद नमुना सोबत सादर करावा. निविदासोबत सादर केलेले नमुन्याप्रमाणेच शेवटपर्यंत चाऱ्याचा पुरवठा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

८. कंत्राटदारांनी निविदेत दिलेले दर निविदा उघडल्यापासून निविदा मंजूर होई पर्यंत किंवा ९० दिवसापर्यंत विधीग्राह्य राहतील.

९. तालुक्यासाठी नमुद केलेल्या चाऱ्याची गरज परिशिष्ट ७ मध्ये नमूद असून त्यात आवश्यकतेनुसार कपात किंवा वाढ करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

१०. सांगली जिल्हयातील निर्दिष्ट केलेल्या चारा डेपोच्या गावी व एकावेळी एकापेक्षा जास्त चारा डेपोंना एकाच वाहनाव्दारे चारा पुरवठा करण्यासाठी उपयोगात आणला जाऊ शकेल.

११. जर विधीग्राह्य दोन किंवा अधिक निविदेमध्ये दिलेले दर सारखेच असतील तर याबाबत जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतिम राहिल.

१२. निविदेसोबत शासकीय अटी शिवाय ठेकेदारांनी मांडलेली इतर कोणतीही अट स्विकारण्यात येणार नाही व तसा उल्लेख केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

१३. चारा पुरवठ्याचे काम एकास किंवा विभागून देण्यात येईल.

१४. प्राप्त निविदेपैकी कोणतीही निविदा स्विकार करण्याचा व कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणयाचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

१५. शासन निर्णय महसुल व वन विभाग क्रमांक एस सी वाय २०११/ प्रक्र २१९ म ७ दिनांक २८.९.२०११ मधील टंचाई परिस्थिती जाहीर करणेबाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हाधिकारी सांगली यांनी दिनांक २८.९.२०११ रोजी टंचाई सदृश्य गावाची यादी घोषित केली असून त्याचे तालुका निहाय गावाची यादी जिल्हापुरवठा अधिकारी सांगली येथे पाहणेस उपलब्ध आहे. भविष्यातील टंचाई सदृश्य परिस्थितीचा आढावा घेऊन तालुक्यातील गावाची संख्या कमी / जास्त करणेचे अधिकारी जिल्हाधिकारी यांना राहतील.

१६. निविदाकारानी चारा वाहतुक दरपत्रके सादर करताना कोणत्या तालुक्याकरीता निविदा दरपत्रके भरली आहेत यासाठी सीलबंद लिफाफयावर तालुक्याचे नाव नमुद करणे आवश्यक राहिल.

१७. ज्या तालुकेसाठी निविदा फॉर्मची मागणी केलेली आहे त्याच तालुकेसाठी परिपूर्ण निविदा भरून सादर करणे बंधनकारक राहिल. तो निविदा फॉर्म अन्य तालुकेसाठी वापरल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

वरील सर्व अटी व शर्ती मी/आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळ : सांगली

निविदाधारकाची स्वाक्षरी
निविदाधारकाचे नांव
व संपूर्ण पत्ता

**टिप :** उपरोक्त अटी व शर्तीचा नमुना प्रत्येक पानावर निविदाधारकाने सही करून शिक्का मारून निविदेसोबत सादर केला पाहिजे.

## परिशिष्ट २

## चारा खरेदी व वाहतुक दर ठरविणेची करारनाम्यातील अटी व शर्ती
## (जिल्हाधिकारी कार्यालय सांगली)

१. चाऱ्याचा पुरवठ्यास तसेच चारा वाहतुकीबाबत आवश्यकतेप्रमाणे आदेश देणेत येतील ही आवश्यकता जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्रधिकृत केलेले अधिकारी ठरवतील. याबाबत कंत्राटदारास एकुण किती चारा पुरवावा लागेल हे भविष्यात होणाऱ्या चारा टंचाई परिस्थितीवर अवलंबुन राहील.

२. चारा पुरवठा करण्याकरीता वाहतूकीच्या वाहनांची स्वच्छता राखणे, दुरूस्त ठेवणे व जनावरांना खाण्यास योग्य अशा सकस चाऱ्याचा पुरवठा करणे यासाठी कंत्राटदार जबाबदार राहतील.

३. पुरविलेल्या चाऱ्याबाबत साठवणुक रजिस्टरमध्ये साठा नोंद तसेच प्रत्येक वाहनाची रोजनिशी जिल्हाधिकारी यांनी नेमून दिलेले सक्षम अधिकारी हे ठरवतील पुरवठयाबाबत संबंधित सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केल्यानंतरच देयक आदा केले जाईल.

४. पुरवठादार यांनी पुरवठा केलेला चारा जनावरांना खाण्यास योग्य असलेबाबत समक्ष अधिकारी यांचे प्रमाणपत्र दिल्याशिवाय कंत्राटदार यांना देयकाची आदायगी करता येणार नाही.

५. प्रत्येक चारा डेपोमध्ये चाऱ्याचे नमुना ठेवणे आवश्यक आहेत. त्याचप्रमाणे चाऱ्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.

६. चारा पुरवठा करताना होणाऱ्या नुकसानीबाबत जसे अपघात आग लागणे किंवा इतर नैसर्गिक अथवा मानवनिर्मितआपत्तीमुळे कंत्राटदाराच्या होणाऱ्या नुकसानिबाबतची भरपाई कंत्राटदाराला दिली जाणार नाही.

७. कंत्राटदारांनी स्पष्ट लेखी आदेश नसताना चारा पुरवठा केल्यास त्याबाबतचा मोबदला देता येणार नाही.

८. चारा पुरवठा व वाहतुकीबाबत शासनाकडुन उपलब्ध होणाऱ्या अनुदानानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे चारा पुरवठा पूर्ण झाल्यानंतर देयके कार्यालयास सादर केलेनंतर नियमानुसार देयकांची छाननी करून रक्कमा वितरीत करण्यात येतील.

९. जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनी आदेश दिल्यानंतर चारा पुरवठा न केल्यास अथवा विलंबाने केल्यास पुरवठा आदेशाच्या दिनाकापासून २४ तासानंतर प्रतिदिन रुपये १०,०००/-(अक्षरी रूपये दहा हजार फक्त) किंवा जिल्हाधिकारी निश्चित करतील त्या दराने दंडाची अकारणी होईल.

१०. जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनी आदेश दिल्यानंतर चारा पुरवठा न केल्यास अथवा चारा पुरवठयाचे काम असमसधानकारक असल्याचे आढळून आल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना राहिल व चारा पुरवठयासाठी दुसऱ्या कंत्राटदाराकडून काम करुन घेतले जाईल. परिणामी होणाऱ्या नुकसानीची भरपाई संबंधित पुरवठाधारकाकडून वसूल करणेत येईल.

११. कंत्राटदारास निविदेच्या कालावधीत दररोज काम देणे बंधनकारक राहणार नाही. आवश्यकतेनुसार चारा पुरवठा आदेश देण्यात येतील. सांगली जिल्ह्यातील निर्माण होणाऱ्या चारा टंचाई परिस्थितीनुसार तालुक्यातील चारा डेपो संख्यामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

१२. शासकीय नियमावलीत वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार अथवा प्रशासकीय आदेशाप्रमाणे होणाऱ्या बदलानुसार जिल्हाधिकारी कार्यालय सांगली यांनी केलेल्या सूचना व अटीचे पालन करणे पुरवठादार/ठेकेदारांवर बंधनकारक राहिल.

१३. पुरविण्यात येणाऱ्या चाऱ्याचे ठेकेदाराने या कार्यालयाकडून नेमलेल्या कर्मचाऱ्याच्या समक्ष नेमून दिलेल्या वजन काट्यावर वजन करणेचे आहे. रिकामे ट्रक व चाऱ्यासह ट्रकचे वजन नेमून दिलेल्या वजन काट्यावर करावयाचे आहे. त्यासाठी येणारा खर्च चारा पुरवठा करणाऱ्या निविदाधारक ठेकेदाराने करावयाचा आहे.

१४. पुरवठा करणेत येणारा चारा जनावरांना खाण्यास योग्य नसलेस अथवा शासनाचे पशुसंवर्धन विभागाने विहीत केलेल्या निकषानुसार खाणेस योग्य नसलेस पुरवठा करणेत आलेला संपुर्ण चारा नाकारणेचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांना आहेत. त्यासाठी फेर वाहतुकीच्या खर्चाची कुठल्याही प्रकारची अदायगी केली जाणार नाही.

१५. चारा साठविण्याचे ठिकाण हे संबंधित तहसिलदार यांनी निश्चित केलेल्या ठिकाणीच चारा पुरवठा करावा लागेल. अन्यत्र केलेल्या चाऱ्या पुरवठ्याचे प्रदान केले जाणार नाहीत.

१६. कंत्राटदाराचे वाहन नादुरूस्त झाल्यास इंधनाभावी अथवा इतर कोणतेही कारणामुळे चारा पुरविण्याचे काम न करता वाहन उभे राहिल्यास त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही. तसेच वाहनाची पर्यायी व्यवस्था तात्काळ करून चारा पुरवठ्याचे काम करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहिल.

१७. जिल्हाधिकारी सांगली यांना ठेकेदाराचा चारा पुरवठा असमाधानकारक आढळून आल्यास काम बंद करण्याचा अथवा तत्सम दुसरी कार्यवाही करण्याचा अधिकार राहील अशावेळी सुरक्षा ठेव, अनामत रक्कम जप्त करणे व नविन निविदा मागणेच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

१८. चारा पुरविण्यासाठी किंवा वाहतुकीसाठी रोख अथवा अगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१९. उपरोक्त प्रक्रियेमध्ये ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे किंवा प्रतिनिधीने गैरव्यवहार किंवा काळाबाजार केल्यामुळे शासनाच्या होणाऱ्या नुकसानीची रक्कम ठेकेदाराकडून वसूल करणेत येईल.

२०. ट्रकमध्ये चारा भरणे व चारा डेपोच्या ठिकाणी चारा खाली करणेची जबाबदारी ठेकेदाराची असेल.

२१. शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा व आदेश ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

२२. चाऱ्याच्या पुरवठ्यात भेसळ (नमुन्या प्रमाणे नसलेला व काळाचारा) आढळून आल्यास भेसळ प्रतिबंधक तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार कार्यालयास राहतील आणि त्यासाठी येणारा जादा खर्च निविदाधारकांडून वसूल करणेत येईल.

२३. चारा डेपो व्यवस्थापन करणारी संस्था तसेच मंडल अधिकारी, विस्तार अधिकारी, पशुधन विकास अधिकारी व तलाठी, ग्रामसेवक, पशुधन पर्यवेक्षक यांचे प्रमाणपत्रानुसार बिले आदा करणेत येईल.

२४. प्रत्येक डेपोला पुरवठा करावयाचा चारा जिल्हा स्तरीय चारा डेपो व्यवस्थापन समिती ठरवून देईल.

२५. वरील अटींचा भंग केल्यास अथवा त्यानुसार कार्यवाही न केल्याचे निदर्शनास आल्यास होणारी दंडात्मक कारवाई व कंत्राट रद्द करण्याचे जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले अधिकार मला/आम्हाला मान्य राहतील.

२६. चारा पुरवठयाबाबत (वाहतुकीसह/ वाहतुक ) मान्य निविदाकारासोबत करण्यात येणारे करारनाम्याचा नमुद कालावधी पुर्ण झालेवर ६महिनेनंतर पुरवठादाराविरुध्द काहीही तक्रार नसलेचे खातरजमा करून पुरवठादारा कडुन इंडेम्नीटी बॉण्ड घेवुन सुरक्षा अनामत रक्कम परत केली जाईल.

२७. चारा उपलब्धता पाहूनच माझी/ आमची खात्री करूनच निविदा भरणेत आलेली आहे.

वरील सर्व अटी व शर्ती मी/आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत.

स्थळ : सांगली

निविदाधारकाची स्वाक्षरी
निविदाधारकाचे नांव
व संपूर्ण पत्ता

**टिप :** उपरोक्त अटी व शर्तीचा नमुना प्रत्येक पानावर निविदाधारकाने सही करून शिक्का मारून निविदेसोबत सादर केला पाहिजे.

## परिशिष्ट ३
## चाऱ्याच्या फक्त वाहतुक दर निश्चितीसाठी निविदा व करारनाम्यातील अटी व शर्ती

१. वाहन पुरविणेसाठी आदेश दिले नंतर वाहन धारकांने आदेशीत केलेल्या ठिकाणी आवश्यक ट्रक्स २४ तासाचे आत पुरविणेचे आहेत.

२. जेव्हा जिल्ह्यातील/ जिल्ह्याबाहेरील चारा उचल व जिल्ह्यातील चारा पुरवठा करणेबाबत आदेश दिला जाईल तेव्हा विनाखंड चारा वाहतुक करणेचा आहे. याबाबत निविदाधारकास कोणताही बदल मागता येणार नाही अथवा तक्रार करता येणार नाही.

३. किमान १० ट्रक स्वत:चे नांवे अथवा वाहतुकदारांशी करारनामा केलेले (नियंत्रणाखालचे) असणे आवश्यक आहे याशिवाय चारा डेपोच्या ठिकाणी पुरेसा व वेळेत चारा वाहतुक करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी वेळोवेळी निश्चित करतील तेवढी वाहने (ट्रक) उपलब्ध करून देणेबाबत हमीपत्र.

४. निविदाधारकांस दररोज चारा वाहतुकीचे काम देणे जिल्हाधिकारी / तहसिलदार यांच्यावर बंधनकारक राहणार नाही.

५. वाहनावर काम करणारा चालक, मदतनीस यांचे पगार व भत्ते, इंधन, वाहनाची देखभाल व दुरूस्ती वरील खर्च, पथकर(टोल), स्थानिककर, जकात अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा खर्च वाहनधारकाने करावयाचा आहे. यासाठी शासनाकडून अगावू रक्कम अथवा परतावा मिळणार नाही.

६. वाहन केव्हा चालू व बंद करावयाचे याबाबत अंतिम अधिकार जिल्हाधिकारी/ तहसिलदार यांचेकडे राहतील याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७. सक्षम अधिकारी यांनी ट्रक क्षमता प्रमाणित केलेले प्रमाणपत्र व वाहतुकीच्या किलोमिटर अंतराबाबत बांधकाम खात्याचे किंवा एसटी महामंडळाचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल.

८. प्रत्यक्ष चारा पुरवठा केलेल्या कामाबाबत ज्या ठिकाणी वाहन दिले जाईल त्या क्षेत्राचे मंडल अधिकारी, विस्तार अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, डेपो चालक यांच्या सहीचा दैनंदिन चारा वाहतुक व पोहच दाखला संबंधित तहसिलदार यांचेकडे हजर करणेचा आहे.

९. चारा पुरवठासाठी केलेल्या प्रवासाची नोंदी लॉगबुकात नोंदवून संबंधित तहसिलदार यांचेकडून साक्षांकित करून घेणेचे आहे. सदरचे लागू पुरते उतारे किंवा प्रमाणपत्र हजर केले शिवाय पेमेंट (बिल) अदा केले जाणार नाही.

१०. अगावू भाडे मिळाले नाही अगर भाडेची देय रक्कम मिळाली नाही या कारणास्तव ट्रक बंद ठेवलेस निविदाधारकाचा ट्रक पुरविणेचा ठेका विना नोटीस रद्द करून बँक गॅरंटी / सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

११. तहसिलदार यांनी नियोजन ठरवून दिलेल्या वेळे प्रमाणे ट्रक चालू न ठेवल्यास निविदा ठेका विना नोटीस रद्द करण्यात येईल.

१२. निविदेमध्ये पुरविण्यात आलेल्या चालू स्थितीतील ट्रकची यादी व्यतिरिक्त ट्रकचा वापर करणेचा झालेस त्याबाबत जिल्हाधिकारी यांची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक राहिल.

१३. जिल्हाधिकारी, तहसिलदार वेळोवेळी जे निर्देश देतील त्याचे पालन करणे निविदाधारकांवर बंधनकारक राहिल.

१४. वाहन यांत्रिकदृष्ट्या चांगल्यास्थितीत असून चारा वाहतुक कामासाठी वापरण्यास योग्य असल्याबाबतचे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) व मालकीच्या व नियंत्रणाखालील ट्रकचे आर. सी. बुक साक्षांकित प्रत निविदाधारकाने हजर करणेचे आहे.

१५. ट्रकद्वारे चारा पुरवठा चालू असताना वाहनाची नादुरूस्ती झालेस निविदाधारकाने पर्यायी वाहनाची व्यवस्था करून निर्देशीत ठिकाणी चारा पुरवठा वेळेत करणेचे आहे.

१६. मोटार वाहतुक अधिनियम व नियमावतील सर्व तरतुदी निविदाधारकांस बंधन कारक राहतील.

१७. चारा पुरवठ्यासाठी उपयोगात आणलेल्या वाहनाचे काही अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी निविदाधारकावर राहिल. त्यासाठी शासनाकडून कोणतीही नुकसान भरपाई देणेचे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

१८. ट्रकच्या भाड्यापोटी द्यावयाची रक्कम ही शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतरच आदा करण्यात येईल काही कारणास्तव रक्कम मिळणेस विलंब झाला तरी त्याची मूळ रक्कमच अदा करणेत येईल. त्यावर कोणत्याही व्याजाची रक्कम निविदाधारकास मागता येणार नाही.

१९. निविदाधारकाकडून वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास निविदेसोबत जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व आशा निविदा धारकाचे नांव काळ्या यादीत समाविष्ट करून त्याचे विरूध्द कायदेशीर कारवाई करणेत येईल तसेच सदरचे काम अन्य ठेकेदाराकडून करून घेतले जाईल त्यासाठी होणारा अतिरिक्त खर्च निविदाधारकाकडून एकरकमी महसुलाची थकबाकी म्हणून वसूल केला जाईल.

२०. वरील अटी व शर्ती यांचा भंग केल्यास ठेकेदार याना प्रती ट्रक, प्रती दिन रक्कम रूपये ५,०००/- दंड आकारण्यात येईल. सदर रक्कम अनामत रक्कमेतून परस्पर कपात करून घेतली जाईल.

२१. याबाबत सर्व निर्णय घेणेचे अधिकार जिल्हाधिकारी, सांगली यांनी राखून ठेवलेले आहेत. चारा टंचाई परिस्थिती चारा पुरवठ्याच्या कालवधीमध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, सांगली यांनी राखून ठेवला आहे.

२२. निविदा मान्य होताच निविदाधारकाने तात्काळ रू. १००/- च्या स्टँम्पपेपरवर शासनाशी करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास आपणास सदरकामाची आवश्यकता नाही असे समजून आपला ठेका रद्द केला जाईल याची नोंद घ्यावी.

**जिल्हाधिकारी, सांगली**

# परिशिष्ट ४
## प्रपत्र
## लिफाफा क्र. २ (व्यापारी लिफाफा)

निविदाधारकाचे नांव :-

संपूर्ण पत्ता :-

ज्या तालुक्यासाठी निविदा भरली त्या तालुक्याचे नाव-

**चाऱ्याचा वाहतुकीसह दर**

**तक्ता : १**

| अ. क्र. | चाऱ्याचा प्रकार | तपशिल | | |
|---|---|---|---|---|
| | | चारा खरेदी दर (प्र. मे. टन/ कि.मी.) रक्कम रूपये | वाहतूकदार (प्र. मे. टन /कि.मी.) रक्कम रूपये | एकूण दर (प्र. मे. टन /कि.मी.) रक्कम रूपये (३+४) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | वाळलेला शाळू | | | |
| २ | ज्वारीचा नविन कडबा, वाळलेला हायब्रीड, ज्वारीचा नवीन कडबा | | | |
| ३ | वाळलेल्या गवताचा चाप | | | |
| ४ | कडबा कुट्टी | | | |
| ५ | इतर कुट्टी | | | |
| ६ | ओला चारा (ऊस वाड्यासह) | | | |
| ७ | ओला चारा (ऊस /कडवळ) | | | |
| ८ | गवत | | | |

**फक्त चारा वाहतुकीचा दर**

**तक्ता : २**

| अ. नं. | चाऱ्याचा प्रकार | फक्त वाहतुकीचा दर प्र. मे. टन / कि.मी. |
|---|---|---|
| १ | ओला चारा | |
| २ | वाळलेला चारा | |

टिप :१) तक्ता १ प्रमाणे चाऱ्याचा प्रति मे. टन दर व वाहतुकीचा प्रति मेट्रीक टन दर हा अंकामध्ये व अक्षरी सुस्पष्टपणे वेगवेगळा दर्शविण्यात यावा निविदा मंजूरीसाठी स्तंभ ३ व स्तंभ ४ मधील दर देणे आवश्यक आहे. निवेदेतील न्युनतम दर हे चाऱ्याचा प्रति मे. टन दर व वाहतुकीचा प्रति मे. टन दर यांची बेरीज करून येणाऱ्या एकत्रीत रक्कमेवर निश्चित करणेत येईल. तक्ता २ प्रमाणे फक्त वाहतुकीचा न्युनतम दर निश्चित करणेत येईल.
२) निविदाकारास एका पेक्षा जास्त तालुक्या करीता दरपत्रके सादर करावयाची असलेस प्रत्येक तालुक्याकरीता वेगळे दरपत्रकाचे परिशिष्ट भरुन दयावे.

ठिकाण :
दिनांक :

निविदा सादर करणाऱ्याचे संपूर्ण
नांव व स्वाक्षरी

\`\`\`\`\`\`\`

## परिशिष्ट ५

## सांगली जिल्हा तालुकानिहाय पशुधन व चारा आवश्यकते बाबत तपशिल (अंदाजित)

| अ.क्र | तालुक्याचे नांव | एकुण जनावरांची संख्या | | | प्रति दिनी लागणारा हिरवा चारा के जी | प्रति दिनी लागणारा हिरवा चारा टनामध्ये | हिरव्या चा-याचे मुल्य लाखात प्रतिदिनी | दरमहा होणारा खर्च लाखात |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लहान | मोठी | एकुण | | | | |
| १ | तासगांव | ३१५८६ | ८५२२४ | ११६८१० | १५१५२५५.०० | १५१५.२६ | २२.७३ | ६८१.८६ |
| २ | कवठेमहांकाळ | १४७३१ | ४६३०५ | ६१०३६ | ८०५०५७.५० | ८०५.०६ | १२.०८ | ३६२.२८ |
| ३ | जत | २५११० | १०५२५२ | १३०३६२ | १७६७१०५.०० | १७६७.११ | २६.५१ | ७९५.२० |
| ४ | विटा | ११६३१ | ४५३८५ | ५७०१६ | ७६८००७.५० | ७६८.०१ | ११.५२ | ३४५.६० |
| ५ | आटपाडी | १५३८९ | २८०३४ | ४३४२३ | ५३५१२७.५० | ५३५.१३ | ८.०४ | २४१.१७ |
| ६ | पलुस | ३४२४ | १४११९ | १७५४३ | २३७४६५.०० | २३७.४७ | ३.५६ | १०६.८६ |
| ७ | कडेगांव | २१२३ | ५८४५ | ७९६८ | १०३५९७.५० | १०३.६० | १.५५ | ४६.६२ |
| ८ | मिरज | ६२६६ | ६५२२९ | ७१४९५ | १०२५४३०.०० | १०२५.४३ | १५.३८ | ४६१.४४ |
| **एकुण** | | **११०२६०** | **३९५३९३** | **५०५६५३** | **६७५७८४५.००** | **६७५७.८५** | **१०१.३७** | **३०४१.०३** |

**जिल्हाधिकारी, सांगली**

**परिशिष्ट ६**

**निविदा फॉर्म मुल्य, बयाणा व अनामत रक्कमांचा तपशिल**

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | एक महिन्याकरिता आवश्यक चारा मुल्य | निविदा फॉर्म फी रक्कम (हजारात) | बयाणा रक्कम (१%) | करारनामा करतेवेळी घ्यावयाची सुरक्षा रक्कम (२%) | देयकातून / एकरकमी घ्यावयाची सुरक्षा अनामत रक्कम (२%) | बँक गॅरंटी रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तासगांव | ६८१८६४७५ | १५००० | ६८१८६५ | १३६३७३० | १३६३७३० | २.०० |
| २ | कवठेमहांकाळ | ३६२२७५८८ | १०००० | ३६२२७६ | ७२४५५२ | ७२४५५२ | २.०० |
| ३ | जत | ७९५१९७२५ | १५००० | ७९५१९७ | १५९०३९५ | १५९०३९५ | २.०० |
| ४ | विटा | ३४५६०३३८ | १०००० | ३४५६०३ | ६९१२०७ | ६९१२०७ | २.०० |
| ५ | आटपाडी | २४११६७३८ | १०००० | २४११६७ | ४८२३३५ | ४८२३३५ | २.०० |
| ६ | पलुस | १०६८५९२५ | ५००० | १०६८५९ | २१३७१९ | २१३७१९ | २.०० |
| ७ | कडेगांव | ४६६१८८८ | १००० | ४६६१९ | ९३२३८ | ९३२३८ | २.०० |
| ८ | मिरज | ४६१४४३५० | १०००० | ४६१४४४ | ९२२८८७ | ९२२८८७ | २.०० |
| **एकुण** | | **३०४१०३०२५** | **७६०००** | **३०४१०३०** | **६०८२०६१** | **६०८२०६१** | **१६.००** |

**जिल्हाधिकारी, सांगली**

**परिशिष्ट ७**

**तालुक्यांची गांव निहाय माहिती दर्शविणारे पत्रक**

| अ.क्र | तालुक्याचे नांव | मंडळाचे नांव | गांवाची नांवे |
|---|---|---|---|
| १. | मिरज(४६ गांवे ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारीची आहेत) | मिरज(४ गांवे) | १) नरवाड, २) टाकळी, ३) बोलवाड, ४) मल्लेवाडी |
| | | आरग(८ गांवे) | १) आरग, २) बेडग, ३) लिंगणूर, ४) खटाव, ५) शिंदेवाडी,६) लक्ष्मीवाडी ७) संतोषवाडी ८) जानराववाडी |
| | | मालगांव (१२ गांवे) | १) मालगांव २) खंडेराजूरी ३) गुंडेवाडी ४) पायाप्पाचीवाडी५) सलगरे ६) चाबुकस्वारवाडी ७) बेळंकी ८) कदमवाडी९) शिपूर १०) डोंगरवाडी ११) एरंडोली १२) व्यंकोचीवाडी |
| | | बुधगांव(१० गांवे) | १) बुधगांव २) माधवनगर ३) बिसूर ४) कावजीखोतवाडी ५) वाजेगांव ६) कुपवाड(मनपा) ७) बामणोली ८) सावळी ९) कानडवाडी १०) मानमोडी |
| | | कवलापूर(१२ गांवे) | १) कवलापूर २) रसूलवाडी ३) खरकटवाडी ४) सांबरवाडी ५) काकडवाडी ६) तानंग ७) कळंबी ८) सिध्देवाडी ९) सोनी १०) करोली एम ११) भोसे १२) पाटगांव |
| २. | तासगांव(६९ गांवे ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारीची आहेत) | तासगांव (१० गांवे | १)तासगांव २) वासुंबे ३) कवठेएंकद ४) चिंचणी ५) भैरववाडी ६) नागाव(क) ७) मतकुणकी ८) बेंद्री ९) शिरगांव(क) १०) कुमठे |
| | | येळावी(९ गांवे) | १) येळावी २) जूळेवाडी ३) तुरची ४) राजापूर ५) निमणी ६) नागांव(नी) ७)नेहरुनगर ८) ढवळी ९) वंजारवाडी |
| | | विसापूर (१३ गांवे) | १) विसापूर २) बोरगांव ३) आळते ४) निबळक ५) चिखलगोठण ६) शिरगावं(वि) ७) लिंब ८) पानमळेवाडी ९) हातनूर १०) गोटेवाडी ११) पाडळी १२) धामणी १३) हातनोली |
| | | मांजर्डे(१२ गांवे) | १) मांजर्डे २) आरवडे ३)तासगांव(पुनदी) ४) बलगवडे ५) गौरगाव ६) पेड ७) मोराळे(पेड) ८) धोंडेवाडी ९) विजयनगर १०) नरसेवाडी ११) कचरेवाडी १२) किंदरवाडी |
| | | सावळज(१३ गांवे) | १) सावळज २) सिध्देवाडी ३) डोंगरवाडी ४) अंजणी ५) वडगांव ६) नागेवाडी ७) लोकरवाडी ८) जरंडी ९) दहिवडी १०) वायफळे ११) यमगरवाडी १२) बिरणवाडी १३) वस्तवडे |
| | | मणेराजूरी (१२ गांवे) | १) मणेराजूरी २) योगेवाडी ३) उपळावी ४) धुळगांव ५) सावर्डे ६) गव्हाण ७) वज्रचौंड ८) कौलगे ९) लोढे १०) खुजगांव ११) वाघापूर १२) डोर्ली |
| ३. | क.महंकाळ (६० गांवे ही ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारीची आहेत) | क.महांकाळ(१३ गांवे) | १) क.महांकाळ २) जाधववाडी ३) झुरेवाडी ४) लांगडेवाडी ५) शिरढोण ६) जायगव्हाण ७) अलकुड(एस) ८) नांगोळे ९) रांजणी १०) लोणारवाडी ११) कोकळे १२) कललहट्टी १३) बस्साप्पाचीवाडी |
| | | कुची(१३ गांवे) | कुची २) जाखापूर ३) तिसंगी ४) कुंडलापूर ५) गर्जेवाडी ६) वाघोली ७) घाटनांद्रे ८) रायवाडी ९) नागज १०) |

| अ.क्र | तालुक्याचे नांव | मंडळाचे नांव | गांवाची नांवे |
|---|---|---|---|
| | | | आरेवाडी ११) केरेवाडी १२) आगळगांव १३) शेळकेवाडी |
| | | देशिंग(८ गांवे) | १) देशिंग २) मोरगांव ३) हरोली ४) बनेवाडी ५) खरशिंग ६) बोरगांव ७) अलकूड(एम) ८) मळणगांव |
| | | हिंगणगांव(१२ गांवे) | १) हिगणगांव २) शिंदेवाडी(एच) ३) विठूरायाचीवाडी ४) थबडेवाडी ५) अग्रण धुळगांव ६) पिंपळवाडी ७) करोली(टी) ८) म्हैशाळ(एम) ९) रामपूरवाडी १०) कोंगनोळी ११) कुकटोळी १२) सराटी |
| | | ढालगांव (१४ गोवं) | १) ढालगांव २) कदमवाडी ३) घोरपडी ४) शिंदेवाडी(घो) ५) निमज ६) दुधेभावी ७) ढोलेवाडी ८) चोरोची ९) चुडेखिंडी १०) जांभूळवाडी ११) इरळी १२) मोघमवाडी १३) लंगरपेठ १४) ढालेवाडी |
| ४ | जत | सर्व मंडळे | तालुकेतील सर्व गांवे |
| ५. | विटा(६६ गांवे ही ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारीची आहेत) | विटा(१४ गांवे) | १) विटा २) माहूली ३) नागेवाडी ४) चिखलहोळ ५) वलखड ६) हिंगणगादे ७) गार्डी ८) घानवड ९) पारे १०) कुर्ली ११) बामणी १२) मंगरुळ १३) चिंचणी मं १४) कार्वे |
| | | भाळवणी (११ गांवे) | १) भाळवणी २) पंचलींगनगर ३) आळसंद ४) वाझर ५) कमळापूर ६) बलवडी भा ७) तांदळगांव ८) जाधवनगर ९) ढवळेश्वर १०) कळंबी ११) खंबाळे भा |
| | | लेंगरे(१३ गांवे) | १) लेंगरे २) भूड ३) मादळमुठी ४) देविखिंडी ५) वाळूज ६) वेजेगांव ७) साळशिंगे ८) भेंडवडे ९) भाग्यनगर १०) देवनगर ११) सांगोले १२) जोंधळखिंडी १३) भिकवडी बु |
| | | खानापूर(१४ गांवे) | १) खानापूर २) रामनगर ३) ऐनवाडी ४) जखिनवाडी ५) पोसेवाडी ६) जाधवाडी ७) गोरेवाडी ८) घोटी खुर्द ९) घोटी बु १०) रेवणगावं ११) धोंडगेवाडी १२) रेणावी १३) वासुंबे १४) भांबर्डे |
| | | करंजे(१४ गांवे) | १) करंजे २) मोही ३) पळशी ४) बानूरगड ५) ताडाचीवाडी ६) हिवरे ७) कुसबावडे ८) भडकेवाडी ९) शेंडगेवाडी १०) धोर्डेवाडी ११) बलवडी(खं) १२) बेनापूर १३) मेगाणवाडी १४) सुलतानगादे |
| ६ | आटपाडी | सर्व मंडळे | तालुकेतील सर्व गांवे |
| ७. | पलूस(६ गांवे ही ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारीची आहेत) | पलूस(५ गांवे) | १) पलूस २) सांडगेवाडी ३) आंधळी ४) मोराळे ५) बांबवडे |
| | | कुंडल(१ गांव) | १) कुंडल |
| ८.. | कडेगांव(१३ गांवे ही ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारीची आहेत) | नेवरी(१३ गांवे) | १) नेवरी २) आंबेगांव ३) येतगांव ४) कान्हरवाडी ५) तूपेवाडी ६) खेराडे(ये) ७) कोतीज ८) ढाणेवाडी ९) खेराडे विटा १०) भिकवडी खु ११) तूपेवाडी(खे) १२) हणमंदवडिये १३) येवलेवाडी |

**जिल्हाधिकारी, सांगली**